# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३४७-२२** **दिनांक २२/११/२०२२**

## घरफोडी करणा-या सराईत गुन्हेगारास २४ तासाच्या आत अटक करून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यास तुळींज गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २०/११/२०२२ रोजी रात्री ०२.०० ते ०२.३० वाजेच्या दरम्यान रुम नं. ३०३, अष्टविनायक बिल्डींग, ए/विंग, नालेश्वरनगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी नामे तनिशा लक्ष्मीप्रसाद रॉय या त्यांचा रुम बंद करून मैत्रीणीकडे गेल्या असता अज्ञात आरोपीत याने रुमचे खिडकीतुन हात घालुन लाकडी पलंगावर ठेवलेली लेडीज पर्समधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकुण ३,७२,०००/- रुपयांचा मुददेमाल चोरी केल्याने फिर्यादी यांचे तक्रारीवरून तुळींज पोलीस ठाणे येथे गु.रजी.नं.७२७/२०२२ भादंवीस कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे तपासादरम्यान तुळींज पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटिकरण पथकाने घटनास्थळाची पाहणी करून माहिती प्राप्त केली असता सदरची चोरी राहुल नावाच्या इसमाने केली असल्याची पोशि/ १३०५२ छपरीबन यांना माहिती प्राप्त झाल्याने गुप्त बातमीदार यांचे मदतीने आरोपीत राहुल सुनिल गाताडे वय २३ वर्षे रा. रूम नं. ४०४ बालाजी निवास टे.डी. हॉस्पिटल नार्लेश्वर नगर मोरेगाव नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर याचा शोध घेवुन आरोपीत हा पळुन जाण्याच्या तयारीत असताना त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यास अटक करून गुन्ह्यात चोरीस गेलेला २०,०००/- रूपये किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल फोन व एकुण- ९१.३२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकुण ३,३२,०००- रूपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/मिथुन म्हात्रे, पोउनिरी/बाळासाहेब बांदल, सहा.पो.उप.निरी/ शिवानंद सुतनासे, पोहवा/अनिल शिंदे पो.हवा/ आनंदमोरे, पोहवा/ उमेश वरठा, पोहवा/ १२०६२ पांडुरंग केंद्रे, पोशि/ १३०५२ छपरीबन, पोशि/१३०४२ राऊत यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. सदर गुन्हयाचा पुढीलतपास सहा.पोलीस निरीक्षक श्री. एम. डी. म्हात्रे हे करीत आहेत.


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
तुळींज पोलीस ठाणे